**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१

**( सकाळी ११.०० वाजता )**

**शुभारंभ : वंदे मातरम्.**

**एक : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **वित्त विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(२) **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(३) **गृह मंत्री** : महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, यांचा सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे चौदावा, पंधरावा, सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) महसूल मंत्री** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा छप्पनावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) अल्पसंख्याक विकास मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **अल्पसंख्याक विकास विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(६) कामगार मंत्री** : (क) नाशिक जिल्हा सुरक्षा मंडळ, नाशिक यांचे सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचे सन २००३-२००४ ते २०१६-२०१७ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी यांचे सन २००९-२०१० ते २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचे सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) सातारा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सातारा यांचे सन २०००-२००१ ते २०१०-२०११ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(छ) इचलकरंजी जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, इचलकरंजी यांचे सन २०११-२०१२ ते २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ज) किराणा बाजार व दुकाने मंडळ, (बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांकरिता) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(झ) पुणे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यांचे सन २००१-२००२ ते २००४-२००५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(त्र) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(७) गृहनिर्माण मंत्री** : (क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **गृहनिर्माण विभागाचे** सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमातंर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ख) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(८) कृषि व माजी सैनिक कल्याण मंत्री** : (क) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**दोन** : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**तीन** : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.

**चार** : अध्यक्षांनी, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे.

**पाच** : **मा. संसदीय कार्य मंत्री यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावरील, दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी, सभागृहात घटित करण्यात आलेल्या संयुक्त समितीवर समिती प्रमुख असलेल्या तत्कालीन गृह मंत्री यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या समिती प्रमुख पदावर गृह मंत्री यांची समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात यावी."

**सहा** : **मा. राज्यमंत्री तथा समिती प्रमुख यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानसभा नियम १८३ च्या पोट नियम (१) अन्वये, राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत या विषयावर गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्याची मुदत पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत वाढवून देण्यात यावी."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी गृह मंत्री यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावर विचार करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी घटित केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत वाढविण्यात यावी."

---

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(२)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(३)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(४)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(५)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(६)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(७)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(८)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ – ॲटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०२१.

**आठ : मा.ग्रामविकास मंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मध्ये नागरीकांच्या मागास प्रवर्गाची पदे आरक्षित ठेवण्याकरीता "राज्य मागासवर्गीय आयोग" घटित करण्यात आलेला असून राज्य मागासवर्ग आयोगास सुलभ संदर्भाकरिता आवश्यक असणारी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ मधील नागरीकांच्या मागास प्रवर्गाची जाती निहाय सर्व माहिती केंद्र शासनाकडे उपलब्ध आहे असे असतांना राज्य शासनाने वारंवार विनंती करुनही केंद्र शासनाने सदर माहिती अद्याप उपलब्ध करुन दिलेली नाही. सबब मागासवर्ग आयोगास इंम्पेरिकल डाटा उपलब्ध करुन देणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून राज्य शासनास नागरीकांच्या मागास प्रवर्गाची सर्व माहिती ( इंम्पेरिकल डाटा ) त्वरीत उपलब्ध करुन द्यावी अशी शिफारस ही विधानसभा केंद्र सरकारला करीत आहे.

**नऊ : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(२)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(३)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, महाराष्ट्र विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(४)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(५)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(६)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(७)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) विधेयक, २०२१.

**(८)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ – ॲटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई विधेयक, २०२१.

**दहा : शोक प्रस्ताव -**

श्री.रावसाहेब चांदोबा अंतापूरकर, वि.स.स., श्री.राजीव शंकरराव सातव, विद्यमान राज्यसभा सदस्य व माजी वि.स.स.,सर्वश्री.संजय वामन देवतळे, रामप्रसादजी विठ्ठलराव बोराडे, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री एकनाथ महादेव गायकवाड, गंगाधरराव मोहनरावजी देशमुख-कुंटुरकर, माजी वि.स.स. व माजी राज्यमंत्री, श्री.शंकर सखाराम नम, माजी वि.स.स. व माजी उप मंत्री, सर्वश्री संभाजी हरी पवार, एकनाथराव पांडुरंग साळवे, केशवराव देवराव महिंद्रे-पाटील, हरिभाऊ रामराव बरकुले, आनंदरावजी तुकाराम वंजारी, रमाकांत शंकर मयेकर, दत्तात्रय उघडु महाजन, प्रकाशराव उत्तमराव डहाके, योगेंद्र रेशमा भोये, पास्कल जान्या धनारे, माजी वि.स.स., श्रीमती ज्योती सुरेश कलानी, माजी वि.स.स. व श्रीमती लताबाई श्रीकृष्ण तांबे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ४ जुलै, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा